महाराष्ट्र शासन
वस्तु व सेवाकर विभाग
विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, ३ रा मजला, एच विंग,
माझगांव,
मुंबई ४०० ०१०. दूरध्वनी क्र. ०२२ २३७६८६८/८७६
ई-मेल आय डी- dcest००१@gmail.com

क्र : राज्य.निरी. २०२३/२४/म.लो.आ.प्रतिक्षायादी/२०२५/आस्था-४/ब- 487 मुंबई, दिनांक- 12 AUG 2025

प्रति,
राज्यकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०२३
प्रतिक्षायादीतील शिफारस पात्र उमेदवार
अ.क्र.१ ते २४.

**विषय:-** राज्यकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०२३ प्रतिक्षायादीवरील उमेदवारांच्या शिफारशीबाबत.

**संदर्भ:-** १. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शासनास पाठवलेले पत्र क्र.१४४२(२)(३)/२०२३/तेवीस दिनांक-२१.०८.२०२४.
२.कार्यासन अधिकारी, वित्त विभाग यांचे पत्र क्र.विकनि-१०२२/प्र.क्र.१७६/वि.प्र.-२ दि.०४.०८.२०२५.
३.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे शासननास पाठवलेले पत्र क्र.१४४२ (२)(१)(२)/२०२३/तेवीस दि.१८.०७.२०२५

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०२३ प्रतिक्षायादीचा निकाल जाहीर करण्यात आलेला असुन प्रस्तुत परीक्षेच्या निकालानुसार राज्यकर निरीक्षक पदी शिफारस केलेल्या उमेदवारांची यादी शासनाच्या उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ वरील पत्रान्वये राज्यकर विभागास प्राप्त झालेली आहे.

प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी शिफारसपात्र उमेदवारांकडून खालील बाबींची पूर्तता करण्याबाबत विभागास कळविण्यात आलेले आहे.

१. शिफारसपात्र उमेदवारांनी खालील नमूद तक्त्यातील वेळापत्रकाप्रमाणे प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी वरील नमूद पत्त्यावर राज्यकर उपायुक्त (आस्थापना-०४) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयात हजर राहावे. तसेच सोबतच्या यादीतील (परिशिष्ट-ब) प्रमाणपत्रे / कागदपत्रे यांच्या मूळ तसेच सत्यापित प्रती (२ संच) साक्षांकन नमून्यासोबत (३ संच) दिलेल्या कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर कराव्यात.

| अ.क्र. | अ. क्र. | प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर करण्याचा दिनांक | निर्धारीत वेळ |
|---|---|---|---|
| १. | १ ते २४ | १९.०८.२०२५ | सकाळी १०.३० a.m ते संध्याकाळी ०५.३० pm |

२. शिफारस यादीतील सर्व २४ उमेदवारांनी नवीन सांक्षाकन नमुना आयोगाच्या **https://mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर सांक्षाकन नमुना डाऊनलोड करुन घेण्याबाबत तसेच तो भरुन (३ प्रतीमध्ये) या कार्यालयामध्ये कागदपत्रे पडताळणी प्रक्रियेवेळी कार्यालयात सादर करावेत.

३. तसेच असेही स्पष्टपणे कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती प्रमाणपत्रे / कागदपत्रे विहीत मुदतीत या कार्यालयात सादर न केल्यास आपणास राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्ती स्विकारण्यास स्वारस्य नाही, असे समजून आपला राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्तीचा हक्क रद्द समजण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

४. प्रस्तुत परीक्षेच्या निकालाआधारे उमेदवारांच्या शिफारशी त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रावरुन तपासण्याच्या अटीच्या अधिन राहून शासनाकडे केल्या आहेत. सदर तपासणीत उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्राची पूर्तता न केल्यास, अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासताना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. प्रस्तुत परीक्षेच्या निकालातून शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या शिफारशी समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून करण्यात आलेल्या आहेत.

६. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिलेल्या सूचना सोबत परिशिष्ट-अ मध्ये जोडण्यात आल्या आहेत.

७. सोबतच्या परिशिष्ट-ब मधील यादीप्रमाणे प्रमाणपत्रे / कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच २ सत्यापित प्रतीचे संच साक्षांकन नमुन्यासोबत वरील कालावधीत (कार्यालयीन वेळेत) या कार्यालयात सादर करावेत.

८. ज्या उमेदवारांना विनंतीनुसारच्या पदस्थापनेसाठी अर्ज करावयाचे आहेत त्या उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी आपला विनंती अर्ज तसेच त्यासोबतची कागदपत्रे सादर करावीत. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची सर्वांनी गंभीरतेने नोंद घ्यावी.

सदरचे पत्र व **परिशिष्ट-अ व ब** या पत्रासोबत वस्तू व सेवाकर विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर **"Whats New"** या सदराखाली उपलब्ध करुन देण्यात आले आहे. उमेदवारांनी पुढील संपर्कासाठी आपला ई-मेल आय.डी, दूरध्वनी क्रमांक व भ्रमणध्वनी क्रमांक साक्षांकन नमुन्यासोबत (Attestation Form) या कार्यालयास सादर करावा.

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने)**

**सहपत्र- परिशिष्ट-अ व ब**

**(डॉ.अभिजीत पाटील)**
**राज्यकर उपआयुक्त (आस्थापना-४),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

## परिशिष्ट-अ

१. प्रस्तुत पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविले आहेत. त्यामुळे उमेदवारांची प्रमाणपत्रे आयोगाकडे उपलब्ध झालेली नाहीत. तसेच, उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची तपासणी आयोगाकडून करण्यात आलेली नाही. आयोगाने प्रस्तूत परीक्षेचा अंतिम निकाल उमेदवारांच्या अर्जातील दाव्यानुसार त्यांची पात्रता विचारात घेऊन जाहीर केला आहे. त्यामुळे उमेदवारांच्या माहितीसाठी शिफारस यादीतील आवश्यक त्या टिपा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करताना सदर टिपा विचारात घेवून नियुक्ती करण्यात यावी अशा आयोगाच्या सुचना आहेत.

(I) **वयोमर्यादा** - दिनांक १ मे, २०२३ रोजी

**i.** अमागास - किमान १९ वर्ष असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.
Age reference date (०२.०५.१९८५ to ०१.०५.२००४)

**ii.** मागासवर्गीय/अनाथ/आ.दु.घ. उमेदवारांकरीता - किमान १९ वर्ष असावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.
Age reference date (०२.०५.१९८० to ०१.०५.२००४)

**iii.** अमागास/मागासवर्गीय/आ.दु.घ. प्राविण्य प्राप्त खेळाडू उमेदवारांकरीता - किमान १९ वर्ष असावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. Age reference date (०२.०५.१९८० to ०१.०५.२००४)

**iv.** अमागास/मागासवर्गीय/आ.दु.घ. माजी सैनिक, आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी उमेदवारांकरीता -किमान १९ वर्ष असावे व कमाल ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.
Age reference date (०२.०५.१९८० to ०१.०५.२००४)

**v.** दिव्यांग उमेदवारांकरीता - किमान १९ वर्ष असावे व कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.
Age reference date (०२.०५.१९७८ to ०१.०५.२००४)

(II) **दिव्यांग** - दिव्यांगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

(III) **अनाथ** - अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे; त्या प्रवर्गातून करण्यात यावा. अनाथ आरक्षणाची अंमलबजावणी दिव्यांग आरक्षणाप्रमाणे करण्यात यावी. अनाथांसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

(IV) **माजी सैनिक-** आरक्षण विहित केले नाही.तथापि वयोमर्यादेत सवलत देण्यात आली आहे.

(V) **शैक्षणिक अहर्ता** - सांविधानिक विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास किंवा तत्पुर्वी (दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ किंवा तत्पुर्वी) धारण करणे अत्यावश्यक आहे. तसेच सदर पदाकरीता मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

(VI) **अंतर्वासिता (Internship)** - निर्धारीत केली असेल अशी पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांनी अंतर्वासिता **(Internship)** मुख्य परीक्षेचे अर्ज स्विकारण्याच्या दिनांकापर्यंत (दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ किंवा तत्पुर्वी) पुर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

**(VII) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (NCL) प्रमाणपत्र** - अराखीव महिलांकरिता आरक्षित पदावरील निवडीसाठी, अराखीव महिला तसेच सर्व मागासप्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे. तरी, शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक महिआ२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ४ मे, २०२३ अनव्ये विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**(VIII) मराठीचे ज्ञान** - प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीमधील परिच्छेद-६.४.४ नुसार मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. सदर बाब संबंधित उमेदवारांच्या दहावीच्या गुणपत्रकाआधारे किंवा महाविद्यालयाच्या प्राचार्य/विभाग प्रमुखांच्या प्रमाणसपत्राआधारे तपासून घेण्यात यावी.

७. शिफारस करण्यात आलेल्या **अनुसूचित जमातीच्या** उमेदवारांचे दावे **आयुक्त, आदिवासी विकास व प्रशिक्षण संस्था, पुणे** यांच्याकडून तपासून घेण्याबाबत तसेच **अन्य सर्व मागासवर्गीय** उमेदवारांचे जाती /जमातीचे दावे नियुक्तीपूर्वी **संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे** यांचेकडून तपासून घेण्यात यावेत.

८. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग या वर्गवारीवर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली उपरोक्त **परिच्छेद ६ (VII)** मध्ये नमुद केलेल्या कालावधीतील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतची विहित नमुन्यातील (NCL) प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तपासून घेवून त्यांच्या नियुक्तीबाबत निर्णय घेण्यात यावा, अशी आयोगाची सूचना आहे.

९. वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा गुवणवत्तेनुसार खुला (सर्वसाधारण) वर्गवारीसाठी विचार करण्यात आला असून मागासवर्गीय उमेदवारांनी वयोमर्यादेत घेतलेली सवलत ही खुल्या प्रवर्गातील पदासाठी अपात्रता समजण्यात येणार नाही. म्हणजेच सवलतीच्या वयोमर्यादेसह त्यांना खुल्या पदांसाठी पात्र समजले जाईल. तसेच मागासवर्गीयांना देय असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेतलेल्या सर्व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांकरीता पदे आरक्षित असलेल्या जाहिरातींच्या बाबतीत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांचा अराखीव पदावरील निवडीकरीता पात्र समजले जाईल. असे असले तरी वयोमर्यादेत सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव पदासाठी विचार शासनाच्या धोरणात्मक निर्णयाच्या अधीन राहून घेण्यात आला आहे.

१०. प्रस्तुत निकालाआधारे पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा व विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दि.१८ ऑगस्ट, २०१६, रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतुदीनुसार तसेच दिनांक ३० जून, २०२२ नुसार आरक्षणासंदर्भात तसेच वयोमार्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात यावी. दिनांक ११ मार्च, २०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतुदीनुसार तसेच दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ च्या

शुध्दीपत्रकानुसार विषयांकित गट-ब पदाकरीता त्यांचे क्रीडाविषयक प्रमाणपत्र वैध ठरते किंवा कसे याच्या पडताळणीकरीता सदर प्रमाणपत्र संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक यांच्याकडे सदर पूर्व परीक्षेचा अर्ज स्विकारण्याच्या दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ या अंतिम दिनांकास किंवा तत्पुर्वी सादर केल्याची पोचपावती, उक्त दिनांकाचे किंवा तत्पुर्वीचे संबंधित क्रीडा प्रमाणपत्र व सदर क्रीडा प्रमाणपत्र गट-ब पदाकरीता वैध ठरत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक यांचा क्रीडा प्रमाणपत्र अहवाल त्यांनी नियुकतीच्या वेळेस सादर करणे अनिवार्य राहील. त्यानुसार उमेदवारांच्या क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची तपासणी करण्यात यावी.

११. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रे वैद्यकिय मंडळाकडून तपासून घेण्याच्या अधीन राहून त्यांची शिफारस करण्यात येत आहे. तसेच **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र .अपंग १००३/प्र.क्र .१२७/२००३/१६-अ, दिनांक ६ मे, २००४ मधील बाब क्र.(६) नुसार त्यांच्या नेमणूकीपूर्वी उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची देखील वैद्यकीय मंडळाकडून तपासणी केल्यानंतर ते नेमणुकीस पात्र ठरतील. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दि.१४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in किंवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेल्या नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र शासनास नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहील.** तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग आरक्षणासंदर्भातील कार्यवाही करण्यात यावी.

१२. अनाथांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांचे आरक्षणासंदर्भातील कार्यवाही शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्रमांकः अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, ०६ एप्रिल, २०२३, दिनांक १० मे,२०२३ अनुसार तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१३. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी,२०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

१४. प्रस्तुत परीक्षेचा अंतिम निकाल मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण व मा.उच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विविध मूळ अर्ज/ याचिका प्रकरणी होणाऱ्या अंतिम निकालाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे ही बाब शिफारसपत्रान्वये उमेदवाराच्या विशेषत्वाने निदर्शनास आणण्यात आली आहे.

१५. प्रस्तुत प्रकरणी प्रतिक्षायादीतून शिफारसपात्र ठरलेल्या २४ उमेदवारांनी मुख्य परीक्षेच्यावेळी सादर केलेल्या ओळखपत्राच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. संबंधित उमेदवारांचा अर्जातील फोटो व प्रत्यक्षात रूजू झालेला उमेदवार तोच आहे का, तसेच त्यांनी परीक्षेच्या वेळी दिलेल्या ओळखपत्रावरून अर्जातील उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी, ओळखपत्रावरील फोटो व स्वाक्षरी त्याच उमेदवाराची आहे का, सादर केलेले ओळखपत्र अधिकृत आहे का, याची नियुक्तीपूर्वी शासनस्तरावरून सखोल तपासणी करण्यात यावी. **तसेच उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी सादर केलेल्या ओळखपत्राची वैधता संबंधित सक्षम प्राधिका-यांकडून तपासून घेण्यात यावी. तद्नंतरच विषयांकित पदावरील उमेदवारांच्या नियुक्त्या करण्यात याव्यात, अशी शासनास विशेषत्वाने सूचना करण्यात येत आहे.**

१६. शिफारस यादीतील सर्व उमेदवारांना आयोगाच्या https://**mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला साक्षांकन नमुना डाऊनलोड करून घेण्याबाबत तसेच तो भरून शासनाच्या वित्त विभाग (प्रशासन-२) या विभागाकडे परस्पर सादर न करता **नियुक्ती देण्यात आलेल्या शासनाच्या संबंधित विभागास सादर करण्याच्या** सूचना देण्यात आल्या आहेत.

डॉ.अभिजीत पाटील
राज्यकर उपायुक्त, (आस्था-४)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# परिशिष्ट-ब

**खालील प्रमाणपत्रे (मूळ कागदपत्र/प्रमाणपत्र व सत्यापित २ प्रतीत) सादर करावीत.**

१. अ) इयत्ता १० वी ची गुणपत्रिका व प्रमाणपत्र.
ब) इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका व प्रमाणपत्र.
क) पदवी परिक्षेची गुणपत्रिका व प्रमाणपत्र (दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३ किंवा तत्पूर्वीचे) तसेच अंतर्वासिता (Internship) प्रमाणपत्र (लागू असल्यास, दि. ०३ ऑक्टोबर, २०२३ किंवा तत्पुर्वी पूर्ण केलेली असणे आवश्यक )

२. जन्मतारखेचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला किंवा एस.एस.सी. उत्तीर्ण प्रमाणपत्र)

३. जातीचा दाखला व वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास)

४. विहित नमुन्यातील अधिवास प्रमाणपत्र. (Domicile)

५. खेळाबाबतचे प्रमाणपत्र (खेळाडू प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांच्याबाबतीत)

६. दोन जबाबदार व्यक्तींकडून आपल्या चारित्र्याचे दाखले.

७. महिला उमेदवारांच्या बाबतीत त्यांचा विवाह झाल्यावर नावात बदल झाला असल्याचा दाखला (विवाह प्रबंधक किंवा राजपत्रित अधिकारी यांचेकडून)

८. MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

९. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्रक **शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, क्रमांक सीबीसी-२०१३/प्र.क्र.२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१ दिनांक १७ ऑगस्ट, २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राचा कालावधी विचारात घेण्यात येईल**. (वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इ.मा.व. प्रवर्गा यांचेकरीता)

१०. शारिरिक दृष्ट्या दिव्यांग असल्याबाबतचा दाखला (लागू असल्यास) (सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दि.१४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संकेतस्थळावरील संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेल्या नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र)

११. आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र (शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे,२०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र)

१२. मुख्य परीक्षेचे प्रवेशपत्र.

१३. मुख्य परीक्षेच्या वेळी सादर केलेले ओळखपत्र --आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड, किंवा स्मार्टकार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी एक.

१४. साक्षांकन नमुना (३ प्रतीत).

१५. परीक्षा अर्जामध्ये अपलोड केलेले मूळ छायाचित्र (फोटो) सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.

१६. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र.

डॉ.अभिजीत पाटील
राज्यकर उपायुक्त, (आस्था-४)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**MAHARASHTRA NON-GAZETTED GR-B SERVICES MAIN EXAMINATION - 2023**

**STATE TAX INSPECTOR**

**LIST OF CANDIDATES - ELIGIBLE FOR RECOMMENDATION FROM WAITING LIST (LOT-1)**

| Sr.No. | Roll No | Candidates' Name | Category | Marks | Recommendation Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | PN010405 | WAGH DHEERAJ NARAYAN | Unreserved | 276.00 | **OPEN - General - 1** |
| 2 | PN001164 | SAVVASHE AKSHAY ANIL | Unreserved | 275.50 | **OPEN - General - 2** |
| 3 | PN004001 | JAYBHAYE PRASHANT SUBHASH | NT-D | 275.50 | **OPEN - General - 3** |
| 4 | PN010446 | KADAM VINAYAK MAHADEV | EWS | 274.00 | **OPEN - General - 4** |
| 5 | PN008172 | SULE VISHAL BHAGVAN | NT-C | 274.00 | **OPEN - General - 5** |
| 6 | PN008335 | GAIKWAD MAHESH ASHOK | EWS | 274.00 | **OPEN - General - 6** |
| 7 | PN005118 | AGARKAR PRATIK MUKUND | Unreserved | 274.00 | **OPEN - General - 7** |
| 8 | AU003249 | SHINDE ANIL VISHNU | EWS | 274.00 | **OPEN - General - 8** |
| 9 | PN003087 | PURI GAURAV CHANDRAKANT | NT-B | 274.00 | **OPEN - General - 9** |
| 10 | PN006083 | PATIL YUVRAJ UTTAM | EWS | 274.00 | **EWS - General - 1** |
| 11 | PN004046 | Sathe Shridhar Shrikant | EWS | 274.00 | **EWS - General - 2** |
| 12 | NG001192 | MALLELWAR SHRUTIKA BRAMHANAND | OBC Female | 258.00 | **OPEN - Female - 1** |
| 13 | PN007313 | Ghuge Rohini Hanumant | OBC Female | 258.00 | **OPEN - Female - 2** |
| 14 | PN002215 | KADAM SNEHAL SUGREEV | Unreserved Female | 257.00 | **OPEN - Female - 3** |
| 15 | PN004358 | KALASE DHANASHRI UTTAMRAO | OBC Female | 257.00 | **OPEN - Female - 4** |
| 16 | PN008242 | NAVGHARE SULOCHANA DATTARAO | Unreserved Female | 257.00 | **OPEN - Female - 5** |
| 17 | PN010221 | KAD RUTUJA NANDARAM | OBC Female | 257.00 | **OPEN - Female - 6** |
| 18 | AM001182 | VEER KRANTI PRAMOD | SC Female | 248.50 | **SC - Female - 1** |
| 19 | NG001114 | SURYAWANSHI ASMITA SANJAY | SC Female | 244.00 | **SC - General - 1** |

**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**

**MAHARASHTRA NON-GAZETTED GR-B SERVICES MAIN EXAMINATION - 2023**

**STATE TAX INSPECTOR**

**LIST OF CANDIDATES - ELIGIBLE FOR RECOMMENDATION FROM WAITING LIST (LOT-1)**

| Sr.No. | Roll No | Candidates' Name | Category | Marks | Recommendation Remark |
|---|---|---|---|---|---|
| 20 | NS001431 | GAWADE ATULKUMAR VIJAY | OBC<br>Hearing impairment | 211.50 | **Divyang - HI - 1** |
| 21 | NS001256 | Sonawane Shubham Yadav | Unreserved<br>Sports | 208.00 | **OPEN - Sports - 1** |
| 22 | NM001257 | Bamane Shobhita Subhash | Unreserved<br>Sports Female | 207.00 | **OPEN - Sports - 2** |
| 23 | PN011434 | KALE ANJALI MARUTI | NT-C<br>Female Multiple Disabilities | 192.50 | **Divyang - ID / MD - 1** |
| 24 | PN007269 | KHANDEKAR AJIT MACHHINDRA | NT-C<br>Orphan - GR-A/B | 184.50 | **- Orphan - GR-A/B - 1** |